महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४
Helpline No. १८०० २२२ ०१९
Website:- https://mahaawaas.com
Email ID:- directoriayruralhousing@gmail.com

वाचा: १. ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. इंआयो-२०१५/प्र.क्र.४१३/योजना १० दि. १०.०२.२०१६

२. मा. संचालक यांची मंजूर टिपणी दि. २६.०६.२०२३.

३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे यांचेकडील पत्र क्र.जिग्राविय/लेख/१४७/२०२३ दि. २७.०६.२०२३

४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नाशिक यांचेकडील पत्र कक्र. प्रमंआयो-ग्रा/कक्ष-१/भांडार/५५४/२०२३ दि. २७.०४.२०२३

५. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगांव यांचेकडील पत्र क्र. जिग्राविय/मॉन-२/आरआर/९३/२३ दि. ३०.०६.२०२३

जा.क्र./राव्यक- ग्रागृ/लेखा (रायो)/ ९५३ /२०२३ दिनांक ०४/०७/२०२३

## आदेश:-

उपरोक्त संदर्भ वाचा क्र. १ अन्वये राज्य पुरस्कृत सामाजिक न्याय विभागाकडील रमाई घरकुल योजना, आदिवासी विभागाकडील शबरी आदिवासी घरकुल योजना, आदिम जमाती घरकुल योजना तसेच पारधी घरकुल योजना व ग्राम विकास विभागाकडील पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेचे संनियंत्रण व अंमलबजावणी राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येत आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार योजने वरील एकुण निधीचा २ % निधी हा व्यवस्थापन खर्च यासाठी मंजूर करण्यात आला आहे. दि २५.०४.२०१७ रोजी झालेल्या कार्यकारी समिती ठराव क्र. ५८ नुसार राज्य पुरस्कृत योजनाकरिता असलेला २ % व्यवस्थापन निधीं राज्य पातळीवर ०.२० %, विभाग पातळीवर ०.०५ %, आणि जिल्हा पातळीवर १.७५ % असा वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भ वाचा क्र. २ ते ५ अन्वये प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे, नाशिक व जळगाव यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत देयके अदा करणेकरिता प्रशासकीय निधी उपलब्ध नसल्यामुळे सदर जिल्ह्यांनी देयकांचे प्रदान राज्य पुरस्कृत योजनेच्या उपलबध प्रशासकीय निधीतून खर्च करण्यात यावे. **प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत निधी प्राप्त झाल्यानंतर प्रदान करण्यात आलेल्या देयकाची रक्कम राज्य योजना प्रशासकीय निधी खात्यात समायोजित करण्यात यावे.**

त्यानुषंगाने सन २०१६-१७ ते २०२२-२३ पर्यंत प्राप्त उद्दिष्टांकरिता राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत प्रशासकीय खर्चाकरिता शिल्लक निधीतून या आदेशान्वये वितरीत करावयाच्या निधीची रक्कम खालीलप्रमाणे:

(रुपये लाखात)

| अ.क्र. | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | या आदेशान्वये वितरीत करावयाचा निधी |
|---|---|---|
| १ | धुळे | १००.०० |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| २ | नाशिक | २००.०० |
| ३ | जळगाव | ५.०० |
| | **एकुण** | **३०५.००** |

त्यानुसार ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे मानधन देणे, तालुका स्तरावरील डेटा एन्टी ऑपरेटर व जिल्हा स्तरावरील प्रोग्रॅमर व डेटा एन्टी ऑपरेटर यांचे मानधन देणे व इतर प्रशासकीय खर्चासाठी या आदेशान्वये रक्कम रु. ३०५.०० लक्ष वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वितरीत निधी आवश्यकतेनुसार पंचायत समितीस वितरीत करण्यात यावा.

**वितरीत केलेला निधी शासन निर्णयानुसार खर्च करण्यात यावा व उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास पाठविण्यात यावे.**

(डॉ. राजाराम दिघे)
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सहाय्यक संचालक, लेखा (राज्य योजना)- उपरोक्त प्रमाणे निधी वितरीत करावा.

२) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे, नाशिक व जळगाव.

Scanned by CamScanner